**प्रकल्प प्रवर्तक मे. कूपर कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड, भूखंड क्रमांक के-१०, अतिरिक्त एम.आय.डी.सी., गाव-कोडोली, जिल्हा -सातारा महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात सिलिंडर लायनर्स सीआय/एसजी आयर्न कास्टिंगचा २,४५०.० मेट्रीक टन प्रतिमास वरुन ते ५,६३३.० मेट्रीक टन प्रतिमास पर्यत (३,१८३.० मेट्रीक टनाने वाढ) प्रस्तावित क्षमता विस्तार करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. कूपर कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड, भूखंड क्रमांक के-१०, अतिरिक्त एम.आय.डी.सी., गाव- कोडोली, जिल्हा -सातारा महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात सिलिंडर लायनर्स सीआय/एसजी आयर्न कास्टिंगचा २,४५०.० मेट्रीक टन प्रतिमास वरुन ते ५,६३३.० मेट्रीक टन प्रतिमास पर्यत (३,१८३.० मेट्रीक टनाने वाढ) प्रस्तावित क्षमता विस्तार करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक १९ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प/कारखाना स्थळ मे. कूपर कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड, भूखंड क्रमांक के-१०, अतिरिक्त एम.आय.डी.सी., गाव-कोडोली, जिल्हा -सातारा महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. अमोल आ. सातपुते, आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी मा. श्री. नागेश पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, श्री. जगन्नाथ शं. सांळुखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

आयोजक यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार सदरहू प्रकल्प हा संवर्ग ( ब ) शेड्युल ३ (ए) धातूशात्र यात मोडत असून प्रकल्पास पर्यावरण अनुमती राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA), पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचेकडून प्राप्त करणे आवश्यक असून त्यासाठी अगोदर पर्यावरणीय जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी अर्ज दिनांक १७/०६/२०२४ रोजी अर्ज सादर केला व त्या अर्जास दिनांक ०५/०७/२०२४ रोजी पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाने मंजूरी प्रदान केली. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात पर्यावरणीय सर्वेक्षण करुन प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन शासनास सादर केलेला आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. कूपर कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड, भूखंड क्रमांक के-१०, अतिरिक्त एम.आय.डी.सी., गाव - कोडोली, जिल्हा -सातारा महाराष्ट्र यांचा त्यांच्या कार्यरत प्रकल्पात सिलिंडर लायनर्स सीआय/एसजी आयर्न कास्टिंगचा २,४५०.० मेट्रीक टन प्रतिमास वरुन ते ५,६३३.० मेट्रीक टन प्रतिमास पर्यत (वाढ - ३,१८३.० मेट्रीक टन) प्रस्तावित क्षमता विस्तार प्रकल्प करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक २९/०७/२०२४ रोजी अर्ज प्राप्त झाला होता.

सहसंचालक (ज.प्र.नि.), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक ३०/०७/२०२४ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

मा. जिल्हाधिकारी, सातारा यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी गुरुवार, दिनांक १९ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ११. ०० वाजता घेणे बाबत मान्यता दिल्यानंतर, मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार कार्यालयीन आदेश क्रं. ई- १५२ /२०२४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२४०९०५ एफटीएस -०१६९ दिनांक -०५-०९-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, सातारा, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी प्रादेशिक अधिकारी -पुणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ, सातारा एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत १७-०८-२०२४ रोजी जनसुनावणीबाबत जाहिरात प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहिती व अवलोकनाकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा
२. जिल्हा उद्योग केंद्र, सातारा
३. जिल्हा परिषद कार्यालय, सातारा
४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ(मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा व चौथा मजला,सायन-माटुंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल(पु.) मुंबई.



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

५. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, तीसरा मजला, पुणे-मुंबई रोड, वाकडेवाडी, पुणे.
६. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासकीय भवन,१५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई.
७. क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यू सेक्रेटरीयल बिल्डींग, तळमजला इस्ट विंग, सिव्हील लाईन नागपूर.
८. उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, एसटी स्टँडच्यापाठीमागे, सदरबझार, सातारा
९. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातारा.
१०.मा.उपविभागीय अधिकारी, उपविभाग सातारा,ता. जि.सातारा.
११.तहसिलदार सातारा,तहसिल कार्यालय सातारा, ता. जि.सातारा.
१२. मुख्याधिकारी सातारा नगरपालिका सातारा.
१३. ग्रामपंचायत कार्यालय कोडोली, ता. जि.सातारा.
१४. ग्रामपंचायत कार्यालय कारंडवाडी, ता. जि.सातारा.
१५. ग्रामपंचायत कार्यालय खिंडवाडी, ता. जि.सातारा.
१६. संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आयोजक यांनी आजपर्यंत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांना १ सूचना/आक्षेप ई मेल द्वारे प्राप्त झालेल असल्याचे नमूद केले

आयोजक यांनी सर्व उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणी दरम्यानउपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

आयोजक यांनी मा.अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च अंदाजे - रुपये १३५.८५ लाख, तर आवर्ती खर्च - रुपये ८७.० लाख रुपये आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. प्रकल्पाची एकूण किंमत ही १३.८५ कोटी असून कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी म्हणून ०.१३९ लाख (प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या १%) इतका आहे.

प्रस्तावित प्रकल्पात बांधकाम टप्प्यात ६१ व्यक्तींना रोजगाराची संधि मिळू शकते, तर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर १४० व्यक्तींना रोजगाराची संधि मिळेल. मात्र प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना/आक्षेप नोंदविण्याच्या वेळी नांव व राहण्याचे ठिकाण सांगण्याची सूचना केली

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री. संतोष सोनबा आगम, राहणार-चंदननगर, कोडोलीगाव, तालुका, जिल्हा-सातारा:-**

आपल्या कारखान्यातून कोणत्या प्रकारचे दुषित पाण्याचे उत्सर्जन होणार आहे व त्याच्या विल्हेवाटीचे काय नियोजन आहे?

प्रकल्पात ब्लो डाऊन, प्रोसेस व कुलिंगमधील सर्व सांडपाणी हे ५.० घनमीटर उत्पन्न होणार असून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी २०.० घनमीटर क्षमतेची औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (ईटीपी) उभारण्यात आलेली आहे. प्रकल्पातील सांडपाण्यावर ईटीपीमध्ये प्रक्रिया केली जाते व प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर प्रकल्पातील स्क्रबिंगसाठी करण्यात येणार आहे.



Scanned with OKEN Scanner

२) **श्री. गणेश शंकर सांळुखे, राहणार- कारंडवाडी, तालुका,जिल्हा-साताराः-**

मी कारंडवाडी गावचा ग्रामस्थ असून आमच्या विंधन विहिरी कंपनीच्या बाजूस ब-यापैकी आहेत. ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या महिन्यात जेव्हा वा-याची दिशा बदलते, त्यावेळी ब-यापैकी रात्री हवा प्रदूषण होते. त्यासाठी काय उपाययोजना केलेल्या आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात हवा प्रदूषण हे बॉयलरच्या इंधन ज्वलनामुळे, तसेच प्रकल्पात होणा-या वाहनांच्या वाहतुकीमुळे होत असते. प्रकल्पातील विविध यंत्रांना अत्याधुनिक असणारी हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा म्हणजे डस्ट कलेक्टर, बॅग फिल्टर, स्क्रबर उपलब्ध करण्यात येणार आहेत. प्रकल्प उत्पादनासाठी लागणारे इंधन म्हणून वीजेचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे उत्पादन प्रक्रियेत धूर उत्पन्न होत नाही. त्यामुळे कारखान्यात धुलीकण, सल्फर-डाय-ऑक्साईड अशी हवा प्रदूषके वातावरणात पडत नाहीत. विविध कारखान्यामध्ये उत्पादन करताना चिमणी (stack) ही स्थापित केलेली असते, त्याची गरज या प्रकल्पात नाही. कारण येथे उत्पादनप्रक्रियेसाठी इंधन म्हणून वीजेचा वापर करण्यात येणार आहे.

प्रकल्पात वाहनांच्या हालचालीमुळे धूळ उडू शकते. त्याची काळजी घेण्यात येईल.

श्री गणेश शंकर सांळुखे यांनी प्रकल्पास शुभेच्छा दिल्या.

३) **श्री बजरंग देशमुख, राहणार-कारंडवाडी ग्रामस्थ, तालुका, जिल्हा-साताराः-**

सादरीकरणात चिमणीचा उल्लेख करण्यात आला. तर चिमणीतून धुर बाहेर पडणार आहे काय?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात जी भट्टी/फर्नेस आहे, त्यास चिमणी (stack) लावण्यात आलेली आहे. त्या चिमणीतून धूळ बाहेर पडत नाही. तर उत्पादन प्रक्रियेत जी धूळ तयार होते, त्यासाठी बॅग फिल्टर, डस्ट कलेक्टर लावण्यात आलेले आहेत.

इतर कारखान्यात असणारे बॉयलर्स, चिमण्या याची आपल्या प्रकल्पात गरज नाही. प्रकल्पात धातू वितळण्याची जी प्रक्रिया आहे, ती भट्टीत होते. भट्टीसाठी वीज वापरण्यात येत आहे.

श्री बजरंग देशमुख यांनी प्रकल्प व्यवस्थापनाचे अभिनंदन केले. त्यांनी मत मांडले की कुपर व स्थानिक कामगार, लोक हे नाते हे एकमेकांसाठी विश्वासाचे आहे. कुपर कंपनीत नेहमीच प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येते, याबद्दल धन्यवाद.



Scanned with OKEN Scanner

४) **श्री विक्रांत जाधव, राहणार-कोडोली, तालुका,जिल्हा-साताराः-**

प्रकल्पातून जी वाळू बाहेर पडते, तिच्या विल्हेवाटीबाबत काय नियोजन आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प उत्पादन प्रक्रियेतून कुठलीच वाळू बाहेर पडत नाही. मोल्डिंग हे भट्टी/फर्नेसमध्येच करण्यात येते. तसेच उर्वरित रिसायकरलकडे (Recycler) पाठविण्यात येते.

त्यावेळी श्री विक्रांत जाधव यांनी आक्षेप नोंदविला की रिसायकरल मोल्डचे ढीग करुन रस्त्याच्याकडेला, जेथे मोकळी जागा कोडोली ग्रामपंचायत हद्दीत असते, तेथे लावून ठेवतात. त्याचा भयंकर त्रास हा स्थानिक लोकांना होत आहे.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की येथील फाऊन्ड्री उत्पादन चालू आहे, ते सेन्ट्रिफ्युगल आहे. प्रकल्पात कुठल्याही प्रकारची वाळू (Sand) वापरण्यात येत नाही. हे सेन्ट्रिफ्युगल पध्दतीने (Action) होणारे कास्टींग-बायकास्ट आहे. श्री विक्रांत जाधव यांनी या प्रक्रियेत पडणा-या स्लजची विल्हेवाट कशी लावणार याबाबत विचारणा केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की या प्रक्रियेत कुठलाही स्लज बाहेर पडत नाही. त्याचा डाय कोटा आहे, त्याचा प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येतो. गेले आठ महिने तो संपूर्णपणे पुनर्वापर (Reuse) करण्यात येतो. प्रकल्पात संपूर्णपणे (शंभर टक्के) वापरला जातो.

श्री विक्रांत जाधव यांनी आक्षेप नोंदविला की ढीगच्याढीग कोडोली ग्रामपंचायत हद्दीत लागलेले आहेत. त्याचे फोटो सादर करता येतील. तर तुमच्या प्रकल्पातून वाळू बाहेर टाकली जाते का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की वाळू बाहेर टाकणे हा विषय या प्रकल्पाशी संबंधित नाही. आमच्या प्रकल्पात गेले दहा वर्षे Sand Reclamation Plant कार्यान्वित आहे. तो ९९% कार्यक्षमतेने कार्यान्वित आहे हे आम्ही दाखवू शकतो.

५) **श्री.विकास सांळुखे, उपसरपंच, कारंडवाडी, तालुका,जिल्हा-साताराः-**

मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रश्न विचारत आहे की जरी कूपर कंपनीने सादरीकरणात पर्यावरण संरक्षणाचे आश्वासन दिलेले असले तरीही जर कूपर कंपनीने काही बेकायदेशीर केले, तर त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येणार का?

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आश्वासन दिले की जनतेकडून ज्या ज्या वेळी तक्रार करण्यात येईल, व त्यात कोणताही कंपनी दोषी आढळल्यास त्यावर विविध पर्यावरण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, प्रश्न, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**६) श्री सुभाष साळुंखे, राहणार-कारंडवाडी, तालुका,जिल्हा-सातारा:-**

प्रस्तावित प्रकल्पात स्थानिक लोकांना रोजगाराची संधि देण्यात यावी ही विनंती

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कार्यरत प्रकल्पात स्थानिक लोकांनाच रोजगाराची संधि देण्यात आलेली आहे. प्रस्तावित प्रकल्पात २०० कुशल,अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे व स्थानिक लोकांनाच रोजगारात प्राधान्य देण्यात येईल.

**७) श्री सुधीर तानावडे, राहणार-कारंडवाडी, तालुका,जिल्हा-सातारा:-**

प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत जो ध्वनी निर्माण होईल, त्यामुळे परिसरातील लोकांना त्याचा काही त्रास होईल काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की या प्रकल्पात जी उत्पादन प्रक्रिया कार्यान्वित असते, ती भट्टी (furnace) मध्ये चालते. तर प्रकल्पात उत्पन्न होणार ध्वनी हा प्रकल्पाच्या अंतर्गत भागातच मर्यादित असतो. तो प्रकल्पाच्या बाहेर जात नाही. तर ध्वनीचा त्रास हा प्रकल्प परिसरातील लोकांना होणार नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, प्रश्न, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**८) श्री जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-**

हा उद्योग मुख्यतः हवा प्रदूषण संदर्भात आहे. या प्रकल्पातून होणारे उत्सर्जन, वातावरणीय बदल, कार्बन क्रेडीट या विषयांवर प्रकल्प व्यवस्थापनाने सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. बैठकीत एक नविन मुद्दा उपस्थित झालेला आहे § वाळूची विल्हेवाट (Sand Disposal). प्रक्रियेत जी काही वाळू उत्पन्न होणार आहे, आणि जी आतापर्यत उत्पन्न झालेली आहे, या प्रकल्पाव्यतिरिक्त, आसपासच्या परिसरात त्याचे ढीग लागलेले असल्याचा आक्षेप बैठकीत नोंदविण्यात आलेला आहे, तो आपल्या कंपनीचा असेल किंवा नसेल, त्याबाबत सकारात्मक विचार करुन अनेक ठिकाणी असलेल्या वाळूच्या ढीगाची त्वरित विल्हेवाट लावण्यात यावी, कारण प्रकल्प प्रवर्तकांकडे Sand Reclamation Plant कार्यान्वित आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण



Scanned with OKEN Scanner

मंडळ त्याबाबत पुढील कार्यवाही करेल. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक यांनी सहकार्य करावे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, प्रश्न, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या परवानगीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेल्या १ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडण्यात येत आहेत.

(अमोल आ.सातपुते)
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सातारा

(जगन्नाथ शं. साळुंखे)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे

(नागेश पाटील)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा
जिल्हा - सातारा



Scanned with OKEN Scanner